# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर



## जाहीर आवाहन

सर्वांना कळविण्यास आनंद होतो की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामार्फत सन २०१५ पासून दरवर्षी विद्यापीठाच्या वर्धापन दिनी म्हणजेच १ ऑगस्ट रोजी राज्य व राष्ट्रीय पातळीवर कला, संस्कृती, साहित्य, शास्त्र, क्रीडां, शिक्षण व संशोधन, सामाजिक, राजकीय, कृषी, उद्योग व व्यापार, पत्रकारिता आदी क्षेत्रांमध्ये जीवनभर सामाजिक बांधिलकी मानून विशेष उल्लेखनीय योगदान (Outstanding/ Extraordinary Contribution) देण्याऱ्या व्यक्तीस **सोलापूर विद्यापीठ जीवन गौरव** पुरस्कार प्रदान करणेस सुरुवात केलेली आहे.

या निवेदनाद्वारे समाजातील सर्व मान्यवरांना आवाहन करण्यात येते की, सन २०२३ च्या **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ जीवन गौरव पुरस्काराकरिता** ज्या व्यक्तींनी राज्य व राष्ट्रीय पातळीवर कला, संस्कृती, साहित्य, शास्त्र, क्रीडा, शिक्षण व संशोधन, सामाजिक, राजकीय, कृषी, उद्योग व व्यापार आदी क्षेत्रामध्ये जीवनभर सामाजिक बांधिलकी मानून उल्लेखनिय कार्य केलेले आहे, अशा व्यक्तीचे **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ जीवनगौरव** या पुरस्काराकरिता विहीत नमुन्यात व विहीत मुदतीत नामनिर्देशन व शिफारस विद्यापीठाकडे सादर करावे. शासनमान्य संस्थांचे प्रमुख, सामाजिक/शैक्षणिक/संशोधन संस्थांचे अध्यक्ष, सोलापूर विद्यापीठाचे अधिसभा व विद्वत सभेचे सदस्य योग्य व्यक्तीचे नामांकन व शिफारस करु शकतात. नामांकन करणारी व्यक्ती फक्त एकाच योग्य व्यक्तीची शिफारस करु शकेल. तसेच व्यक्तीला स्वत: ही अर्ज करता येईल.

सदर पुरस्काराकरिता नियमावली व विहीत नामांकन करण्याचा नमुना विद्यापीठाच्या http://www.sus.ac.in/ आणि https://su.digitaluniversity.ac/ **या संकेतस्थळावर Circular व Download या मथळयाखाली प्रसिध्द** करण्यात आलेला असून प्रसिध्द करण्यात आलेल्या नियमावलीचे अवलोकन करुन सदर अर्ज पूर्णपणे भरुन आवश्यक त्या सहपत्रांसह तीन प्रतीत **दि. ३०/०६/२०२३** पर्यंत विद्यापीठाकडे म्हणजेच **मा. कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र. ९ केगाव, सोलापूर - ४१३ २५५** या पत्त्यावर हस्तदेय/पोस्टाद्वारे सादर करावेत. सदर अर्ज कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळता स्वीकारण्यात येतील.

०६।०६।२३
(योगिनी घारे)
कुलसचिव

जा.क्र. पुअहोसोविसो/कु.का/वर्धापन दिन/२०२३/३५७३, दि. ०६ जून, २०२३

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
## सोलापूर विद्यापीठ, सोलापूर



# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ जीवनगौरव पुरस्कार : आदर्श नियम

१. कला, संस्कृती, साहित्य, शास्त्र, क्रीडा, शिक्षण व संशोधन, सामाजिक, राजकीय, कृषी, उद्योग व व्यापार आदी क्षेत्रांपैकी एखाद्या क्षेत्रामध्ये जीवनभर विशेष उल्लेखनीय योगदान (Outstanding/Extraordinary contribution) देणाऱ्या व्यक्तीस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ जीवनगौरव पुरस्कार विद्यापीठ वर्धापन दिनी देऊन सन्मानित करण्यात येईल.

२. पुरस्कारासाठी निवड करण्यात येणाऱ्या/नामनिर्देशित करण्यात येणाऱ्या हयात व्यक्तीचे किमान वय ६२ वर्षापेक्षा कमी नसावे. तथापि, यशस्वी योग्य व्यक्तीच्या बाबत सदर वय मर्यादा शिथिल करण्यात येईल.

३. **पुरस्काराचे स्वरुप** (Nature of Award) : रोख रक्कम रु. ५१,०००/- (रुपये एकावन्न हजार फक्त) सन्मानपत्र व गौरवचिन्ह असे राहील.

४. **नामनिर्देशन पध्दत :** सदरील पुरस्कारासाठी प्राप्त अर्जामधून एका व्यक्तीची या पुरस्कारासाठी निवड करण्यासाठी त्रिसदस्यीय समितीचे गठण व्यवस्थापन परिषद सदस्यांमधून करण्यात येईल. समितीने एका व्यक्तीची निवड करुन तशी शिफारस व्यवस्थापन परिषदेकडे करावी. तथापि, जर आलेल्या प्रस्तावामधून समितीस योग्य व्यक्तीचा प्रस्ताव आला नाही असे वाटल्यास समिती त्या वर्षी जीवनगौरव पुरस्कारसाठी निरंक अशी शिफारस करेल.

५. **नामनिर्देशन करण्याचे मुद्दे :**

  १. सदर पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तीची / नामनिर्देशित व्यक्तीची जनमानसात स्वच्छ प्रतिमा असावी आणि त्यांचे नैतिक अधिष्ठान व कार्य इतरांना मार्गदर्शक ठरावे. ती व्यक्ती निर्व्यसनी व निष्कलंक असावी आणि त्यांच्याविरुध्द कसल्याही प्रकारच्या फौजदारी स्वरुपाच्या गुन्हयाची नोंद नसावी. तसे स्वयंघोषणापत्र स्वतंत्ररित्या स्व: स्वाक्षरीने प्रस्तावासोबत जोडावे.
  २. ज्या क्षेत्रात कार्य केलेले आहे ते कार्य नाविन्यपूर्ण समाजोन्नतीचे असावे.
  ३. कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य
  ४. साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य
  ५. पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य
  ६. शिक्षण व संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य
  ७. क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य
  ८. सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य
  ९. राजकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य
  १०. इतर क्षेत्र : कला व सांस्कृतिक, उद्योग व व्यापार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य

**६. तांत्रिक अटी :**

१. पुरस्कार विभागून दिला जाणार नाही.

२. पुरस्कारासाठी राज्यस्तरापर्यंतची व्याप्ती असेल. तथापि, संबंधित व्यक्तीची नाळ सोलापूर जिल्ह्याशी निगडीत असेल अशा ख्यातनाम व्यक्तीचा अग्रकमाने विचार करावा.

३. पुरस्कारासाठी पात्र व्यक्ती आढळून न आल्यास पुरस्कार त्यावर्षी घोषित केला जाणार नाही.

४. सदर पुरस्कार मरणोत्तर जाहिर करण्यात येणार नाही.

**७. नामनिर्देशन / अर्ज करण्याची शिफारस :**

१. एखाद्या योग्यताप्राप्त व्यक्तीची परीपूर्ण अर्जासह/कागदपत्रांसह शिफारस इतर व्यक्तीला करता येईल.

२. त्या व्यक्तीला स्वत: अर्ज करता येईल.

**८. इतर माहिती:**

१. जीवनगौरव पुरस्काराच्या निवडीसाठी त्रिसदस्यीय समिती असेल. त्या-त्या क्षेत्रात वर निर्देशित समकक्ष पातळीवर कसोट्या लावून पुरस्कारासाठी अंतिम निवड करावी. समितीचा निर्णय अंतिम असेल.



# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## “पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ जीवनगौरव पुरस्कार”

## <u>नामनिर्देशन-शिफारस करण्याचा नमूना</u>

(सदर अर्ज पूर्णपणे भरुन आवश्यक त्या सहपत्रांसह तीन प्रतिमध्ये सादर करावा)

| | | |
|---|---|---|
| १. | नांव | : |
| २. | जन्म दिनांक | : |
| ३. | वय | : |
| ४. | जन्म स्थळ | : |
| ५. | राष्ट्रीयत्व | : |
| ६. | शैक्षणिक अर्हता | : |
| ७. | व्यवसाय (हुद्दा) | : |
| ८. | व्यावसायिक अनुभव | : |
| ९. | आवडीचे क्षेत्र | : |
| १०. | कोणत्या गावात/विभागात/जिल्हयात कार्य केले | : |
| ११. | प्राप्त सन्मान, पुरस्कार | : |
| १२. | विशेष कामगिरी आवडीच्या क्षेत्रामध्ये सातत्याने कार्यरत राहून समाजोन्नतीसाठी केलेली विशेष कामगिरी (जवळपास दोन पेजेस मध्ये पेपर कात्रणे किंवा प्रमाणपत्रासह वेगळे परिशिष्ट जोडून माहिती द्यावी.) | : |
| १३. | प्रतिज्ञापत्र (Undertaking) | : सोबत विहीत नमुना. |

**ठिकाण : ---------------------**

**दिनांक : --------------------**

**नाव: -----------------------**

**सही: -----------------------**

# प्रतिज्ञापत्रक

मी_______________________________राहणार___________________________ माझ्या माहितीप्रमाणे; प्रतिज्ञापूर्वक सादर करतो की; मी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ जीवनगौरव पुरस्कारासाठी सादर केलेली माहिती/सहपत्रे ही बरोबर आहेत. तसेच माझ्या माहितीप्रमाणे; माझ्याविरुद्ध /नामनिर्देशित व्यक्ती विरुध्द अधिकाराचा गैरवापर केल्याची तक्रार नाही अथवा कसल्याही प्रकारच्या फौजदारी स्वरुपाच्या गुन्हयाची नोंद नाही.

**ठिकाण :** _____________

**दिनांक :**_____________

**नाव :** -----------------------

**सही :** -----------------------